माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ३२७४ / २०२३ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| यशवंत राजाराम निकम | प्र(गृह) नायब तहसिलदार., कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्याल्य, कोल्हापूर |

( सुनावणी दिनांक -१६/०१/२०२५ व दि. १८ /०२ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १०.०६.०२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार दोन्ही सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. तथापि, अपिलार्थीचे लेखी निवेदन आयोगास प्राप्त आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१२ .०१.२०२३ च्या अर्जात स्वसंरक्षणासाठी शस्त्र (पिस्तुल) परवाना मिळणेबाबत केलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख आयोगासमोर सादर झालेले नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती पुरविली असून त्यांच्याकडे नसणारी माहिती पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर व तहसिलदार सर्वसाधारण यांच्याकडे पाठविण्यात आला आहे सबब, अपिल नामंजूर केले आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केली आहे. अपिलार्थी दोन्ही वेळा सुनावणीस आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर आहेत. यावरुन त्यांना प्रस्तूत अपिल चालविण्यात स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सदरचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३२७४ / २०२३ / कोल्हापूर /7330/2025 दिनांक - 5/3/2025